**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2019 = 6.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, MAY-JUNE, 2020, VOL- 7/59*

# सद्यस्थितीत आगरकरांच्या स्त्रीविचारांचा मागोवा

**पल्लवी रविंद्र चव्हाण**

***संशोधन विद्यार्थिनी (राज्यशास्त्र विभाग, सा. फुले पुणे विद्यापीठ, पुणे)***

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रास्ताविक:** बेंथम मिलप्रणीत व्यक्ति स्वातंत्र्यवाद व उपयुक्ततावाद, स्पेन्सरप्रणीत उत्क्रांतीवाद व अज्ञेयवाद आणि युरोपातील प्रबोधन उत्तर बुद्धिवाद व सुखवाद या गोपाळ गणेश आगरकरांच्या वैचारिक श्रद्धा होत्या.म्हणूनच त्यांचे स्त्रीविषयक प्रश्न व सुचविलेल्या उपाययोजना हे वैचारिक प्रेरणेचे फलित आहे. आगरकरांच्या सामाजिक विचारात कुटुंबव्यवस्थेचा प्राधान्याने विचार केलेला आहे. त्यांच्या मते ज्या समाजाची कुटुंबव्यवस्था विस्कळीत झाली आहे तो समाज प्रगती करू शकत नाही. त्या समाजाला परंपरागत विचारांतून बाहेर पडून काही नवे शिकण्याची बुद्धि होत नाही. म्हणून कुटुंबव्यवस्था सदृढ पायावर अभारलेली असावी. कुटुंबव्यवस्थेत स्त्रियांचे स्थान काय असावे, त्यांना शिक्षण देणे यांसारख्या प्रश्नांवर आगरकरांनी विचार केलेला आहे.

**आगरकरांचे स्त्रीविषयक विचार:** स्वातंत्र्यपूर्व कालखंडात मांडलेल्या समाजसुधारकांच्या विचारांमध्ये एकसमानता दिसून येते. आधुनिक शैक्षणिक विचारसरणीमुळे जीवित स्वातंत्र्य व जीवनमूल्ये सर्वसामान्यांना परिचित झाली. युरोपातून आलेल्या विचारधारा आणि नवशिक्षित तरुणांवर त्याचा झालेला परिणाम. भारतीय समाजरचनेत एकत्र कुटुंबपद्धती होती. कुटुंबात स्त्री-पुरुष हे दोन प्रमुख घटक होते. त्यापैकी स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्त्व व तिचे व्यक्ति म्हणून असलेले स्थान पुर्णपणे उपेक्षित होते. भारतीय लोकसंख्येतील अर्ध्या भागाची भागीदार असलेली स्त्री-संख्या विषमतेच्या व पारतंत्र्यात बंदिस्त होती. स्त्रिजातीविषयी व स्त्रियांच्या असाधारण गुणांविषयी लोकांत पुण्यबुद्धी नव्हती. या आणि अशा प्रकारचा दृष्टिकोन, स्त्री दुःखाविषयीची सहानुभूती, अन्यायाची चिडचिड, न्याय मिळवून देण्याची जिद्द व समाजरचना निकोप असावी हा ध्यास या संमिश्र भावनांतून स्त्री जीवनाचा सूक्ष्म अभ्यास केला. स्त्री

**जीवनाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी अनेक उपाय सुचविले आहेत त्यामुळे त्यात जिवंतपणाबरोबरच ज्वलंतपणाही आलेला आहे.**

**अ. स्त्री-शिक्षणाला अग्रक्रम: आगरकरांनी स्त्री उन्नतीसाठी अनेक उपाय सुचविले आहेत. त्यात स्त्री-शिक्षणाचा उपायांवर सर्वोत्तोपरी भर दिला आहे.**

**१. स्त्री-पुरुष एकत्र शिक्षणाचा पुरस्कार : यामध्ये स्त्री-पुरुष एकत्र शिक्षणाचा आधुनिक पद्धतीचा पुरस्कार केला आहे. कुटुंबाच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्र शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादली आहे. आगरकर म्हणतात,"स्त्रि पुरुषास एकत्र शिक्षण दिल्यामुळे कित्येक पुरुषांस घरी बसून मुले खेळवण्याची , लुगडी धुण्याचे, भांडी घासण्याचे,स्वयंपाक करण्याचे, दळणकांडण करण्याचे काम करावे लागले तर त्याला आम्ही काय करावे असली कामे स्त्रियांनीच करावी हा काही ईश्वरी नियम नाही" १म्हणजेच कुटुंबातील कामाची विभागणीसुद्धा समान तत्त्वावर झाली पाहिजे असा उच्च विचार सनातन काळात मांडणारे आगरकरांचा दूरदृष्टिपणा इथे दिसून येतो. हा विचार आता शहरी भागात पूर्णपणे रुजलेला दिसून येतो. हा त्यांचा समतालक्षी उदारमतवादी विचार तत्त्व म्हणून जरी शहरी भागात मान्य झाला असला तरी अंशतः बाहेरची कामे पुरुषांची व घरातील कामे स्त्रियांची अशा पुरुषी विचाराला अनेक स्त्रिया बळी पडलेल्या दिसतात. १८८५ साली आगरकरांनी स्त्रियांच्या शिक्षणातून मांडलेला विचार आजही तितकाच प्रखर वाटतो.**

**२. स्त्रियांच्या प्राथमिक ते उच्च शिक्षणाची गरज: आगरकरांच्या काळात स्त्री शिक्षणाबाबत अतिशय प्रतिकूल परस्थिती असताना त्यांनी मुलींच्या शिक्षणाची गरज समाजाला तर्कशुद्ध पद्धतीने समजावून सांगितली आहे. या स्त्री शिक्षणाबाबत सरकारचे कर्तव्य विषाद करताना ते म्हणतात,"गार्गीवाचक्नवी किंवा वडवाप्रतियेयी अशा पूर्वकालीन स्त्रीयांच्या नावावरून किंवा रामायणमहाभारतादि पुराणांत अथवा कालिदासभवभूत्यादिकांच्या ग्रंथात स्त्री शिक्षणाचा जो अप्रत्यक्ष उल्लेख आला असेल त्यावरून भरतखंडात बायकांस शिक्षण देण्याचा परिपाठ होता."२असा उल्लेख आगरकरांनी करून झाशीच्या लक्ष्मीबाईस राजकार्य, पंडिता रमाबाई उच्च विद्या, मुकताबाईंनी तत्त्वज्ञान संपादन केले असे दाखले देऊन, "कित्येक राजघराण्यांतील स्त्रियांस नर्तनगायनवादनादि कलांबरोबरच वाचनलेखनादि कला**

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**शिकविण्याची रूढि असेल. "३ असे संगितले आहे. अशा पद्धतीने आगरकरांनी स्त्री शिक्षणाची परंपरा आपल्याकडे उपलब्ध असल्याचे दाखले देऊन तर्कशुद्ध पद्धतीने पटवून दिले आहे.**

**प्राथमिक शिक्षण वास्तविक पाहता मुलांपेक्षा मुलीस विशेष जरुरीचे आहे असे त्यांनी प्रतिपादले आहे. "ज्या स्त्रीवर आपण आपत्य संगोपणाचे एवढे जबाबदारीचे काम सोपिवले तिला अक्षरशत्रू असू देणे हे अत्यंत अहीतकारक आहे असे आम्हास वाटते."४अशा कठोर शब्दांत स्त्रीशिक्षण विरोधकांवर टीका केली आहे. आज मुलींचे प्राथमिक शिक्षण व्यवहारात सर्वमान्य झाले आहे. ग्रामीण भागातही प्राथमिक शिक्षण हक्काचे झाले आहे. आगरकरकालीन समाजव्यवस्थेत हे विचार मांडणे यथायोग्यच होते. सुधारकांच्या लेखणीचा प्रभाव निश्चितच मान्य करावा लागेल. त्याचा परिणाम म्हणून स्त्री शिक्षणाचा मार्ग सर्व थरातील स्त्रियांसाठी मोकळा झाला आहे.**

**३. लोकसंख्येचा वाढता भार : स्वातंत्र्यपूर्वकाळात स्त्री शिक्षणास विरोध करणाऱ्या लोकांनी समाजात अनेक चुकीचे गैरसमज पसरविले होते. या विरोधाला न जुमानता आगरकरांनी घरकाम व आपत्य संगोपन स्त्रियांनीच केले असे कोणालाही सिद्ध करता येणार नाही, अशी विवेकवादी भूमिका मांडली. प्रत्येक स्त्रीला आपल्याला किती आपत्य असावीत याचा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असावे असे प्रतिपादन करताना, "स्त्रीयांप्रमाणे पुरुषांनाही प्रसुती वैराग्य होण्याचा संभव असता तर उभयताच्या संमयाने बराच भूभार कमी होतो." त्याकाळी आरोग्य सुविधांची उपलब्धता नसणे किंवा अभावामुळे प्रजनन संख्या जास्त होती. परिणामी सर्व मुलांच्या संगोपणाचा भार एकट्या स्त्रीलाच सोसावा लागे. आज २१ व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. परंतु आगरकरांचे विचार आपण अंगिकारले असते तर कदाचित लोकसंख्या नियंत्रित होऊन विज्ञानवादी समाजाची निर्मिती झाली असती.**

**४. स्त्री विषयक दुटप्पी भूमिका: समाजातील कर्ते पुरुष धर्माचा दाखला देत स्त्रियांना अर्धांगीनी म्हणतात. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात तिला दुय्यम भूमिका दिली जाते. हा दुटप्पीपणा आगरकरांच्या काळात आजच्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त होता. त्यावेळी टीका करणे अपरिहार्य होते. आज हा विचार महाराष्ट्रात कालबाह्य मानला जात असला तरी उत्तर भारतात मोठ्या प्रमाणावर अद्यापही समाजात पडदा पद्धती अवलंबिली जात असल्याचे दिसते.**

**ब ) विवाह पद्धत : आगरकरांच्या काळात स्त्री उन्नतीला व स्वातंत्र्यास बाधा आणण्यासाठी अनेक अनिष्ट रूढी-परंपरा प्रचलित होत्या. अशावेळी आगरकरांनी राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी राजकीय सुधारणेपेक्षा सामाजिक सुधारणेस अग्रक्रम दिला. त्यासाठी उदारमतवादी मूल्य व शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. या त्यांच्या दृष्टेपणाचा अनुभव भारताच्या स्वातंत्र्यातनंतर पहिल्याच वर्षी हिंदू-कोड बिलाच्या रूपाने आपणास आला. आगरकरांनी आपल्या समाजसुधारणेत सर्वोच्च स्थान कुटुंबसंस्थेला दिले आहे.**

**१. संमतीवर आधारित विवाह पद्धत: स्त्री आत्मसन्मान व प्रतिष्ठेच्या दृष्टीने विवाहसंस्थेचा आधार हा परस्पर संमती हाच असला पाहिजे असे म्हणणे होते. म्हणूनच या तत्त्वाची पायमल्ली करणाऱ्या अनिष्ट रूढी-परंपरांना आगरकरांनी कडाडून विरोध केला. आगरकरांनी सर्व ठरविलेल्या विवाहांना बालविवाह असे उपहासाने म्हंटले आहे. "स्वयंवरास संमती असल्याने बालविवाहाचे खंडन म्हणजे स्वयंवराचे मंडन."५असे आगरकर म्हणतात. सद्यस्थिती लक्षात घेता विवाहसंस्थेमध्ये स्वयंवर तत्त्व रुजलेले दिसते. ही एक जमेची बाब आहे. परंतु हे प्रमाण शहरी भागापुरते मर्यादित आहे. संमती तत्त्वाचे हे लोण अनेक खेडोपाडी वर्ग, जाती व स्थर या वर्तुळात रुजण्याची गरज आहे. संमतीवर आधारित किंवा प्रीती विवाह असल्यास आजही कुटुंबातील नाकर्त्यांमुळे सिनसाक प्रवृत्ती डोके वर काढताना दिसते. याचे वास्तववादी चित्रण आपल्याला 'सैराट' सारख्या अनेक चित्रपटातून पाहावयास मिळत आहे. वृत्तपत्रांच्या माध्यमातूनही अशा अनेक बातम्या वाचावयास मिळतात. यावरून प्रश्न पडतो की समाज आधुनिकतेकडे खरेच वाटचाल करताना दिसतो का? आगरकरांनी मांडलेले विचार आजही उद्‌बोधक ठरतात.**

**२. बाल विवाहास बंदी : विवाह संस्थेचा आधार संमती हाच असला पाहिजे अशी आगरकरांची आग्रही भूमिका असल्याने त्याकाळी निर्माण झालेल्या बालविवाह प्रतिबंधक कायद्याचे समर्थन केले. बालविवाहाने स्त्रियांची परिपूर्ण वाढ न झाल्याने त्याचे दुष्परिणाम प्रसंगी कुटुंब, समाजाला भोगावे लागतात. त्यांनी न्यायाच्या तत्त्वास अनुसरून बालविवाह ऐवजी प्रौढ विवाहाचा पुरस्कार केला आहे. बालविवाहाचा धिक्कार करताना ते म्हणतात, "जी स्वयंवरे नाहीत त्यांना आम्ही बालविवाहच समजतो."६मुलीला स्वतःचा पती मिळवण्याचा अधिकार, महाराष्ट्र बालविवाह निषेध मंडळाची स्थापना करण्याचे सुचवून अल्प वयातील मुला-मुलींचे**

**विवाह न करण्याची शपथ घेण्यास सांगितले. स्त्रीला एक माणूस म्हणून जगता यावे यासाठी त्यांनी बालविवाहास विरोध केला. आज एकीकडे स्त्रीला देवता म्हणायचे आणि तिचे शोषण करायचे हा दांभिकपणा दिसून येतो. त्यामुळे आगरकरांनी मांडलेल्या विचारांचा दैनंदिन जीवनात वापर करणे आवश्यक आहे.**

**३. घटस्फोट, पुनर्विवाह आणि केशवपण: आगरकरांच्या काळात विधवा पुनर्विवाह बंदी, सती प्रथा व केशवपण यामुळे विधवा स्त्रियांच्या दुःखास अंतच नसे. या अनिष्ठ व अमानुष रूढीविरुद्ध ३ मार्च १८९० च्या 'सुधारकात' 'अजून तरि सावध व्हा!' या लेखात आगरकारांनी केशवपण चालीविरुद्ध ब्राह्मण वरगास इशारा केला आहे."ज्या लोकांत केशवपणाची चल आहे त्या जातींतील म्हणजे ब्राह्मणवर्गानी बरेच लोक आधुनिक शिक्षणाच्या जोराने स्त्रियांवर होणारा जुलूम पाहण्यास दिवसानुदिवस नाखुष होत आहेत. हा काय हो संतोषाचा भाग आहे?"७ केशवपणाची चाल आज पूर्ण संपुष्टात आली आहे. काही स्त्रिया समाज निंदेस्तव पुनर्विवाहास धजावत नाहीत. घटस्फोटाबाबतीतही असाच अनुभव येतो. याशिवाय स्त्रियांचे आर्थिक स्वावलंबन व सुरक्षितता यामुळे स्त्रिया अन्याय सहन करून आयुष्य कंठतात. त्यामुळे स्त्रियांच्या अन्यायाविरुद्ध स्त्री हक्क व समाज प्रबोधनाची तितकीच आवश्यकता आहे.**

**क) सदोष कुटुंब व्यवस्था : आगरकरांनी कुटुंबव्यवस्थेविषयीचे विचार अतिशय चिकित्सक व विवेकनिष्ठ आहेत. आगरकरांच्या काळात कुटुंबात स्त्रीवरील अन्याय व अत्याचाराचे प्रमाण आजच्या कितीतरी पटीने जास्त होते. याला कमी अधिक प्रमाणात घरातील स्त्रियांच जबाबदार असत. यावर उपाय म्हणून कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीस चांगले शिक्षण व स्वातंत्र्य मिळाले पाहिजे असे सांगितले.एक प्रश्नाविषयी ते म्हणतात , "दोष सासवा सुनाचा नाही तो एक व्यवस्थेचा आहे. या व्यवस्थेत परिवर्तन झाल्याशिवाय स्त्रीची स्त्रीपासून होणारी छळवणूक तरि कशी थांबणार?" आजच्या काळात स्त्री हिंसाचाराचे प्रमाण बहुसंख्येने कमी झाले आहे. मराठवाड्यात मात्र अजूनही हुंडा प्रथेची चाल व स्त्रीभ्रूण हत्येस अनेक कारणापैकी एक कारण हिंसाचारास निमित्त ठरत आहे. म्हणूनच आजही पूर्णपणे आगरकरांचे विचार समाजात रुजले नाही असे म्हणावे लागे.. स्त्रियांच्या व्यक्तितत्त्वाला रूढी-परंपरांनी घातलेल्या शृंखला काढून टाकून त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराला ठेचून त्यांचे जीवन उन्नत करण्याचे कार्य करणे सध्या काळाची गरज बनलेली आहे.**

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**संदर्भग्रंथ**:

*नातू म. गं. व दि. य. देशपांडे, 'आगरकर वाङ्मय खंड-१' म. रा. सा. आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृष्ठ-२०१*

*उनि. पृष्ठ-१९५*

*तत्रैव पृष्ठ- १९५*

*उनि. पृष्ठ-१९२*

*उनि. पृष्ठ-२८४*

*६. तत्रैव पृष्ठ-२८४*

*उनि. पृष्ठ-११८-११९*

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*